वर्ष-०९ | अंक-४२ | मुंबई, मंगळवार ०५ ते ११ ऑगस्ट - २०२३ | पृष्ठ-४
मूल्य २/- रुपये
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र
## POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 सोयाबीन पिवळं पडतंय का?
3 → भारतीय ज्ञान परंपराच्या समावेशाचे स्वागतच हवे!
बांगलादेशीं नागरिकांची घुसखोरी थांबेना ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

# मित्राने कर्जाचे हप्ते न फेडल्याने व्यापाऱ्याने केली आत्महत्या



## भाईंदर मधील घटना

वसई- मित्राने घेतलेले कर्ज न फेडल्याने आर्थिक अडचणीत सापडेल्या भाईंदर मधील एका व्यापाऱ्याने स्वतःला पेटवून आत्महत्या केली. गिरीधर सोलंकी असे या मयत व्यापाऱ्याचे नाव आहे. रुग्णालयात उपचार सुरू असताना सोलंकी शनिवारी रात्री मृत्यू झाला. नवघर पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. भाईंदर पुर्वेच्या नवघर परिसरात असलेल्या न्यू चंदन इमारचीत राहणाऱ्या गिरीधर सोलंकी (५८) हे व्यापारी रहात होते. नवघर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मुंबईच्या सायन येथे राहणाऱ्या चंद्रकांत गलाटे (५८) याच्याशी सोलंकी याची मैत्री होती. गलाटे याला वैयक्तिक कामासाठी २५

> मित्राने घेतलेले कर्ज न फेडल्याने आर्थिक अडचणीत सापडेल्या भाईदर मधील एका व्यापाऱ्याने स्वतःला पेटवून आत्महत्या केली.

लाखांची गरज होती. कर्जाचे हप्ते मी फेडतो फक्त कर्ज तुझ्या नावावर घे,अशी गळ त्याने सोलंकी यांना घातली. त्याच्या बोलण्यावर सोलंकी यांनी विश्वास ठेवून स्वतःच्या तसेच आई आणि भावाच्या नावावर २५ लाखांचे कर्ज घेतले. त्यासाठी भाईंदर येथील राहते घर तारण म्हणून ठेवले होते. २०१५ मध्ये गलाटे याने हे कर्ज घेतले होते. सुरवातीला काही हप्ते भरल्यानंतर त्याने हात वर केले. त्यामुळे बँकेने सोलंकी यांच्या मागे कर्ज भरण्यासाठी तगादा लावला होता. सोलंकी यांच्या घरावर देखील जप्तीची नोटीस आली होती. मित्र कर्जाचे हप्त भरत नाही, घरावर जप्ती येईल यामुळे निराश झालेल्या सोलंकी यांनी १५ ऑगस्ट रोजी राहत्या घरात अंगावर सॅनिटाझर टाकून स्वतःला पेटवून दिले. तेव्हापासून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. दरम्यान, शनिवारी रात्री उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला, अशी माहिती नवघर पोलिसांनी दिली. सोलंकी यांच्या आत्महत्येला जबाबदार असणाऱ्या चंद्रकात गलाटे (५८) याच्यांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी कलम ३०६ अन्वये गुन्हा दाखल केला असून त्याला अटक केली आहे. रविवारी दुपारी त्याला न्यायालयात हजर करण्यात आले अशी माहिती पोलीस उपनिरीक्षक सचिन उबाळे यांनी दिली.

# कल्याण-डोंबिवलीतील विना परवाना बाजार भरविणाऱ्या मालकांना नोटिस

## खासगी बाजार चालकांमध्ये खळबळ



कल्याण– घर, इमारत परिसरातील मोकळ्या जागांमध्ये पालिकेच्या बाजार परवाना विभागाची परवानगी न घेता दररोज किंवा आठवड्यातील ठराविक दिवशी विविध वस्तु विक्रींचा बाजार भरविणाऱ्या मालक, चालकांना पालिकेच्या बाजार परवाना विभागाने नोटिसा पाठविण्यास सुरुवात केली आहे.

**कल्याणमधील महालक्ष्मी हॉटे लजवळील लक्ष्मी बाजारातील गौतम शहा, वसंत व्हॅली येथील शंकर म्हात्रे यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत**

या कारवाईने खासगी बाजार चालकांमध्ये खळबळ उडाली आहे.
कल्याणमधील महालक्ष्मी हॉटेलजवळील लक्ष्मी बाजारातील गौतम शहा, वसंत व्हॅली येथील शंकर म्हात्रे यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत, अशी माहिती एका पालिका अधिकाऱ्याने दिली. कल्याण डोंबिवली पालिका हद्दीत अनेक जमीन, इमारत, घर मालकांनी आपल्या वास्तुच्या परिसरातील मोकळ्या जागांमध्ये फरीवाले, भाजीविक्रेते, इतर गृहपयोगी वस्तु, सवलतीच्या दराने वस्तु विक्रीसाठी जागा उपलब्ध करुन दिल्या आहेत. असे बाजार भरविण्यापूर्वी जागा मालकांनी पालिकेच्या बाजार परवाना विभागाची परवानगी घेणे आवश्यक असते. या माध्यमातून पालिकेला महसुल मिळतो. हा महसुल बुडविण्यासाठी बाजार मालक पालिकेकडून अशाप्रकारची परवानगी न घेता खुलेआम दररोज, आठवड्यातील काही दिवस मोकळ्या जागेत बाजार भरवत असल्याचे पालिकेच्या मालमत्ता विभागाच्या उपायुक्त वंदना गुळवे ...पान २ वर...

## शिवसेना-भाजपाच्या दहीहंड्यांमुळे डोंबिवलीत रस्ते वाहतुकीत बदल

डोंबिवली – शिवसेना, भाजपाच्या डोंबिवली पूर्व, पश्चिम भागातील दहीहंडी कार्यक्रमांमुळे डोंबिवली पूर्व भागातील बाजीप्रभू चौक, पश्चिमेतील पंडित दिनदयाळ रस्त्यावरील वाहतुकीत ६ सप्टेंबर रोजी रात्री १२ ते ७ सप्टेंबर रोजी रात्री १२ वाजेपर्यंत बदल करण्यात आले आहेत. डोंबिवली वाहतूक विभागाने ही रस्ते बदलाची अधिसूचना सोमवारी जाहीर केली.
डोंबिवली पूर्वेत भाजपातर्फे बाजीप्रभू चौकात दहीहंडी उत्सव साजरा होत आहे. या कार्यक्रमासाठी ६ सप्टेंबर रोजी रात्री १२ वाजल्यापासून ते ७ सप्टेंबर रोजी रात्री १२ वाजेपर्यंत फडके रस्त्यावरुन बाजीप्रभू चौक येथे येणारी वाहतूक बंद करण्यात येत आहे. ही वाहतूक फडके रस्त्यावरुन डावे वळण घेऊन फत्तेह अली रस्त्यावरुन पालिका डोंबिवली विभागीय कार्यालय येथून वळविण्यात आली आहे. डोंबिवली पश्चिमेत पंडित दिनदयाळ रस्त्यावर सम्राट चौक येथे माजी सभापती दीपेश म्हात्रे फाऊंडेशनतर्फे दहीहंडी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. या उत्सवासाठी डोंबिवली पश्चिम रेल्वे स्थानक भागातून मोठागाव, ...पान २ वर...

## थोडक्यात

### भारताच्या चांद्रयान ३ या मिशनमध्ये सिंहाचा वाटा उचलणाऱ्या इस्त्रोच्या शास्त्रज्ञा एन वलारमथी यांचं आज हदयविकाराच्या झटक्याने निधन



चेन्नईतील एका रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला आहे. चांद्रयान ३ च्या उड्डाणापूर्वी एन वलारमथी यांनीच त्याचं उलटं टायमर लावलं होतं. तसेच चांद्रयान चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर लँड होताच त्यांनी सहकाऱ्यांसह देशाला आनंदाची बातमी दिली होती. त्यामुळं आता इस्त्रोच्या शास्त्रज्ञा एन वलारमथी यांच्या निधनामुळं भारतासह जगभरात शोक व्यक्त केला जात आहे. काही दिवसांपूर्वी चांद्रयान ३ चंद्रावर उतरवून आनंद साजरा करणाऱ्या इस्त्रोच्या शास्त्रज्ञांवर दुखाचा डोंगर कोसळला आहे.

### पाच विभागांकडू न राज्यभर एकत्र कारवाई; दुधातील भेसळ रोखण्यासाठी आक्रमक पवित्रा



ठाणे : मुंबई महानगर क्षेत्रासह राज्यभर दूध भेसळ रोखण्यासाठी गेल्या पंधरवडय़ापासून मोठी मोहीम हाती घेण्यात आली आहे. यामध्ये प्रथमच महसूल, पोलीस, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय तसेच अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी एकत्रितरीत्या सहभागी झाले आहेत. सण, उत्सवाच्या तोंडावर ही मोहीम तीव्र करण्याच्या सूचना आहेत. तपासणीसाठी घेण्यात आलेल्या नमुन्यांचा चाचणी अहवाल सात दिवसांत प्राप्त करण्याचे आदेश पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी दिले आहेत. राज्यातील दुधाचे दर तसेच दूध भेसळीसंबंधीच्या प्रश्नाबाबत दूध उत्पादक, सहकारी तसेच खासगी दूध संघ आणि शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींची एक बैठक नुकतीच पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय मंत्री राधाकृष्ण विखेपाटील यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे पार पडली होती.

# मीरा रोडमध्ये पोलिसावर हल्ला करून आरोपी फरार, पोलिसाची प्रकृती गंभीर




मीरारोड- पोलिसावर हल्ला करून आरोपी पळून गेल्याची घटना मीरा रोडमध्ये घडली आहे. जयकुमार राठोड असे या हल्ल्यात जखमी झालेल्या पोलिसाचे नाव आहे. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहे. मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या कार्यालयात रविवारी मध्यरात्री दिडच्या सुमारास ही घटना घडली. आरोपी बेड्यांसह फरार झाला असून त्याच्या शोधासाठी वेगवेगळी पथके तयार करण्यात आली आहे. मीरा रोड येथील गुन्हे शाखेच्या इमारतीत मध्यवर्ती गुन्हे शाखेचे कार्यालय आहे. गुन्हे शाखेच्या पथकाने मोबाईल चोरीच्या प्रकरणात एका आरोपीला अटक केली होती. या आरोपीला हातात बेड्या घालण्यात आल्या होत्या. बंदोबस्ताला दोन पोलीस होते. रविवारी मध्यरात्री दीडच्या सुमारास बंदोबस्तावरील एक पोलीस कर्मचारी जेवण आणण्यासाठी गेला. जयकुमार राठोड हा पोलीस हवालदार कार्यालयात होता. ती संधी साधून आरोपींना बेडीतून हात बाहेर काढला. लोखंडी रॉडने जयकुमार राठोड यांच्या डोक्यावर हल्ला केला आणि कार्यालातून पळून गेला. राठोड यांच्या डोक्यावर तीन ठिकाणी गंभीर जखमी झाल्या आहेत. त्यांना उपचारासाठी आधी लाईफ लाईन रुग्णालयात नेण्यात आले होते. नंतर त्यांच्या मीरा रोडच्या वोक्हार्ड रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती गंभीर आहे ...पान २ वर...

## युट्युब न्यूज चॅनलच्या तीन कथित पत्रकारांनी 'हा' के ला कारनामा, खंडणीचा गुन्हा दाखल




ठाणे : एका युट्यूब चॅनेलच्या कथित तीन पत्रकारांनी खासगी रुग्णालयाच्या बदनामीचा मजकूर लिहून व्हिडिओ बनवला. हा व्हिडिओ प्रसारित करण्याची धमकी देत रुग्णालयाच्या व्यवस्थापकाकडे २५ हजार रुपयांची खंडणी मागितली. या प्रकरणी युट्यूब न्यूज चॅनलच्या तीन पत्रकारांवर डॉक्टरांच्या तक्रारीवरून शांतीनगर पोलीस ठाण्यात खंडणीसह विविध कलमान्वये आज गुन्हा दाखल केला आहे. इमरान, ...पान २ वर...

# ब्राम्हण समाजाबद्दल सार्वजनिक ठिकाणी गरळ ओकणा-या लोकप्रतिनिधींवर कार्यवाही करणार - मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे



- अखिल भारतीय ब्राम्हण महासंघाचे निवेदन
- अमृत योजनेसाठी १५० कोटी रुपयांची मंजुरी
- शासनाच्या योजनेपासून कोणीही वंचीत राहणार नाही.

परभणी - येथे रविवार २७ ऑगस्ट रोजी शासन आपल्या दारी प्रशासकीय कार्यक्रमासाठी राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडनवीस, उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार, पालकमंत्री तानाजीराव सावंत यांच्यासह असंख्य लोकप्रतिनिधींनी हजेरी लावली होती. याच कार्यक्रमात शेकडो लाभार्थ्यांना शासनाचा लाभ देण्यात आला. यावेळी अखिल भारतीय ब्राम्हण महासंघाचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ता संजय कुलकर्णी (सुपेकर) यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह अनेक लोकप्रतिनीधींशी भेट घेवुन त्यांना भगवान श्री परशुरामाची प्रतिमा भेट देवुन ब्राम्हण समाजाच्या गेल्या अनेक वर्षापासुन शासन दरबारी प्रलंबित पडलेल्या मागण्यांचे निवेदन देवुन ब्राम्हण समाजाविषयी वारंवार सार्वजनिक कार्यक्रमात गरळ ओकणा-या लोकप्रतिनीधींवर कार्यवाही करण्याची मागणी केली.

शासन आपल्या दारी या प्रशासकीय कार्यक्रमासाठी परभणी येथील कृषी विद्यापीठाच्या प्रनांगनात रविवार २७ ऑगस्ट रोजी भव्य कार्यक्रम देण्यात आला. या कार्यक्रमात परिसरातील असंख्य योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना थेट लाभ देण्यात आला. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडनवीस , उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार, परभणीचे पालकमंत्री ना. तानाजी सावंत यांच्यासह असंख्य लोकप्रतिनीधी व सर्वच अधिका-यांची व्यासपिठावर उपस्थिती होती. शासनाच्या सर्वच योजनांचा लाभ लाभार्थ्यांना मिळणार असल्याची ग्वाही संबंधित मंत्री महोदयांनी जनतेला दिली असुन कोणताही तळा गाळातील नागरिक शासनाच्या विविध योजनेपासुन वंचित राहणार नाही अशी ग्वाही यावेळी सर्वच लाकप्रतिनीधींनी आपल्या मनोगतातुन जनतेला दिली.

सदरील कार्यक्रम संपल्यानंतर अखिल भारतीय ब्राम्हण महासंघाचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ता संजय कुलकर्णी (सुपेकर) यांनी मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडनवीस आदी लोकप्रतिनीधींची त्यांना भगवान श्री परशुरामाची प्रतिमा भेट देवुन ब्राम्हण समाजाच्या गेल्या अनेक वर्षापासुन शासन दरबारी प्रलंबित पडलेल्या मागण्या त्वरीत पुर्ण कराव्यात अशा अशयाचे निवेदन देण्यात आले... देण्यात आलेल्या निवेदनातील मागण्या..

१. भगवान श्री परशुरामाच्या नावाने स्वतंत्र्य अर्थिक विकास महामंडळ स्थापीत करावे.
२. ७५ हजार पुरोहीत्य करणा-या ब्राम्हणांना राज्यशासनाकडुन प्रति महीना ५००० रुपये मानधन सुरु करावे (तेलंगना राज्य सरकारच्या उपक्रमाप्रमाणे)
३. शालेय अभ्यासक्रमात वैद्यीक शिक्षण विषय अनिवार्य करावा.
४. महाराष्ट्रातील नोंदणीकृत वेदशाळांना मदरसाच्या धरतीवर अनुदान व शैक्षणिक सुविधा राज्य शासनाकडुन देण्यात याव्यात.
५. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात ब्राम्हण समाजातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वस्तीगृह उभारण्यात यावे.
६. ब्राम्हण समाजाला अर्थिक निकशावर शासनाच्या विविध योजनांमध्ये सामाविष्ट करण्यात यावे.
७. कुळात गेलेल्या ब्राम्हण समाजाच्या जमिनी परत ब्राम्हण समाजाच्या व्यक्तींनाच देण्यासाठी शासन दरबारी आदेश पारीत करावेत. ...पान २ वर...

# कारल्याची शेती



पावसाळ्याच्या दिवसात काही शेतकरी भाजीपाला लागवड करून लाखो रुपये कमवत आहेत. पारंपरिक पिकांऐवजी बागायती पिकांच्या लागवडीवर भर दिला जात आहे. विशेषतः दुहेरी उद्देशाच्या भाजीपाल्याची मागणी बाजारात वाढत आहे. औषधी मूल्य असलेल्या कारल्याच्या शेतीवर बहुतांश शेतकरी भर देत आहेत.

**संकरित वाणाची लागवड -**

कमी कष्टात देशी कारल्यापेक्षा चांगले उत्पादन देत असल्याने शेतकरी आता देशी कारल्याऐवजी संकरित कारल्याच्या लागवडीला पसंती देत आहेत. संकरित कारल्याची झाडे वेगाने वाढतात आणि त्यांची फळे देखील सरासरी आकारापेक्षा खूप मोठी असतात. देशी कारल्याप्रमाणे त्यांचीही लागवड केली जाते, परंतु त्यांची संख्या अधिक आहे. संकरित कारल्याचा रंग हिरवा असतो आणि चवही चांगली असते, त्यामुळे त्याच्या बिया बाजारात थोड्या महाग मिळतात. कारल्याच्या चांगल्या प्रतीच्या आणि उच्च उत्पादनासाठी शेतकऱ्यांनी संकरित कारली पिकाची लागवड करावी, असा सल्लाही कृषी तज्ज्ञ देतात.

हायब्रीड कारल्याच्या सदाहरित वाणांच्या लागवडीसाठी हवामानाचे कोणतेही बंधन नसल्याने अनेक शेतकरी संकरित कारली वेगवेगळ्या भागात पिकवून चांगले पैसे कमवत आहेत. त्यांच्या फळांची लांबी १२ ते १३ सेमी आणि वजन ८० ते ९० ग्रॅमपर्यंत असते. एक एकर शेतात हायब्रीड कारले पिकवल्याने ७२ ते ७६ क्विंटल उत्पादन मिळते, जे सामान्यपेक्षा खूप जास्त आहे.

विशेषतः प्रिया आणि कोईम्बतूर लवंग या संकरित कारल्याच्या जाती उत्पादनाच्या बाबतीत अव्वल आहेत. याशिवाय पुसा ते मोसमी, पुसा स्पेशल, कल्याणपूर, कोईम्बतूर लांब, कल्याणपूर सोना, बारमाही कारला, प्रिया सीओ-१, एसडीयू-१, पंजाब कडू-१, पंजाब-१४, सोलन हारा, सोलन आणि बरहमास अशा कारल्याच्या जातींना ही मागणी आहे.

**अशी करा लागवड -**

उत्तम निचरा होणारी वालुकामय, चिकणमातीची जमीन संकरित कारल्याच्या लागवडीसाठी उत्तम आहे. उष्ण तापमानात फुले फुलतात. एक हेक्टर क्षेत्रामध्ये कारल्याच्या लागवडीसाठी १.८ ग्रॅम बियाणे आवश्यक आहे, ज्याची लागवड रोपवाटिकेत बीजप्रक्रिया केल्यानंतरच करावी. रोपवाटिकेमध्ये रोपे तयार केल्यानंतर शेत सेंद्रिय पद्धतीने तयार करून रोपांची ओळीत लागवड करावी. वेल व्यवस्थित पसरवण्यासाठी शेतकरी स्टेजिंग बनवतात, ज्यामुळे उत्पादन आणि उत्पादकता दोन्ही वाढते.

**ही घ्या खबरदारी -**

कारल्याची फळे आणि वेलींपेक्षा त्याच्या मुळांवर कीटक आणि रोगांचा प्रादुर्भाव जास्त असतो, त्यामुळे मळ्यासोबतच मुळांवरही लक्ष ठेवावे. कीटक-रोगांच्या प्रतिबंधासाठी कीटकनाशकांचा वापर करावा. शेतकऱ्यांना हवे असल्यास ते जीवनमृत आणि नीमस्त्राचाही वापर करू शकतात. संकरित कारल्याच्या भाजीपाल्यापासून बियाणे घेऊन पेरणी केल्याने पिकामध्ये अनेक समस्या निर्माण होतात, त्यामुळे त्यांचा वापर करू नये. वास्तविक, तिखटाचे संकरित बियाणे प्रयोगशाळेतच तयार केले जाते, ज्याची लागवड एकदाच केली जाते, त्यामुळे प्रमाणित दुकानातूनच चांगल्या दर्जाचे बियाणे खरेदी करावे.

# मूग, उडीद पिकांवरील रोगांचे नियंत्रण

आहारात मुगास अनन्यसाधारण महत्त्व आहे. मुगामध्ये २४ ते २५ टक्के उच्च दर्जाची प्रथिने व मुबलक खनिजे आहेत. या प्रथिनांचे प्रमाण गव्हाच्या दुप्पट, तर तांदळाच्या तिप्पट आहे. कडधान्य पिकामध्ये अल्पावधीत तयार होणारे खरीप व उन्हाळी हंगामातील हे पीक मातीच्या सुपीकतेसाठीही तितकेच महत्त्वाचे पीक आहे.

पीक पद्धतीत मुगाचा समावेश केल्यास त्याच्या मुळावरील गाठीमध्ये असलेले रायझोबिअम जीवाणू हवेतील नत्र शोषतात. पिकांची नत्राची गरज भागवली जाते. या पिकानंतर घेतल्या जाणाऱ्या पिकालाही त्याचा फायदा होतो. तसेच हे पीक जमिनीत गाडल्यास हिरवळीच्या खतपिकाप्रमाणे जमिनीचा कस सुधारतो. मात्र, हे फक्त ६५ ते ७० दिवस इतक्या कमी कालावधीचे असल्यामुळे बहुतांश शेतकरी त्यावरील रोगांबाबत अनभिज्ञ असतो किंवा दुर्लक्ष करतो. रोगाचा प्रादुर्भाव आणि प्रसार अनुकूल वातावरणामध्ये या पिकावर लवकर होतो. त्यामुळे हेक्टरी १२ ते १४ क्विंटल उत्पादन देण्याची क्षमता असलेले मूग हे पीक अपेक्षित उत्पादन देऊ शकत नाही. त्यामुळे या पिकवरील रोगाचे नियंत्रण कसे करायचे हे जाणून घेऊ..

**लीफ क्रिंकल:-** हा एक विषाणूजन्य रोग आहे. मूग किंवा उडीद पीक पेरल्यानंतर साधारणतः तीन आठवड्यांनंतर या रोगाची लक्षणे दिसायला सुरुवात होते. सर्वप्रथम पानातील हरितद्रव्य कमी झाल्यामुळे पाने फिकट पिवळसर दिसतात. रोगग्रस्त झाडांच्या



पानांवर खोलगट व उभारलेले भाग दिसतात. पानांच्या कडा खालच्या बाजूला वळतात. झाडांची वाढ खुंटते. झाडे शेंड्याकडून खाली वाळत येतात. प्रादुर्भावग्रस्त झाडांना शेंगा येत नाही. आल्या तरी त्या संख्येने खूप कमी, आकाराने लहान, वेड्या वाकड्या असतात. हा रोग अत्यंत नुकसानदायक आहे. तो येऊच नयेत यासाठी दरवर्षी आणि सातत्याने व्यवस्थापन पद्धतीमध्ये पुढील प्रतिबंधात्मक बाबींचा अंतर्भाव करावा.

१) शेतातील रोगकारक घटकांचा नाश करण्यासाठी लागवडीपूर्वी जमिनीची खोल नांगरणी करावी. काडीकचरा गोळा करून जाळून नष्ट करावा.

२) पेरणी करताना जास्त दाट करू नये. त्यातील अंतर ३० बाय १० किंवा ४५ बाय १० सें.मी. ठेवावे.

३) पेरणीसाठी विषाणूमुक्त बियाणे वापरावे.

४) शेत तणविरहित ठेवावे. खुरपण करावी.

५) मूग पिकाबरोबर आंतरपीक म्हणून ज्वारी, बाजरी आणि मका ही पिके घेतल्यास कीटकाद्वारे रोगाचा प्रसार कमी होतो.

६) पिकास जास्त नत्रयुक्त खत देऊ नये. पिकांची कायिक वाढ होते. किडींचा प्रादुर्भाव वाढतो.

७) जमिनीत एकच पीक न घेता फेरपालट करावी.

८) हा रोग बियाण्याद्वारे पसरत असल्यामुळे बियाण्यास गरम पाण्याची प्रक्रिया करावी.

९) रसशोषक किडींचा सुरुवातीच्या काळातील प्रादुर्भाव रोखण्यासाठी इमिडाक्लोप्रिड ५ ग्रॅम किंवा इमिडाक्लोप्रिड १० ग्रॅम प्रति किलो याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी.

**सद्य:स्थितीतील व्यवस्थापन :-**

१) पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शेतात १५ बाय ३० सें.मी. आकाराचे पिवळे चिकट सापळे हेक्टरी १६० प्रमाणात पिकाच्या उंचीच्या समकक्ष उंचीवर पेरणीनंतर १५ दिवसांनी लावावे.

२) मावा, पांढरी माशी व फुलकिडे यांचा प्रादुर्भाव दिसताच शिफारशीत आंतरप्रवाही कीडनाशकाच्या फवारणीचे नियोजन करावे.

# रोपवाटिका व्यवसायात संधी

**भारतात आधुनिकतेच्या आणि विकासाच्या नावाखाली हिरवळ नष्ट झाली, पण काळानुरूप लोकांना समजू लागले आहे की, झाडे-झाडे यांच्याशिवाय जीवनाची कल्पना करणे व्यर्थ आहे, म्हणूनच सरकार विविध वृक्षारोपण मोहिमा राबवते. झाडे लावणे आणि फलोत्पादनामुळे लोकांमध्ये भरभराट होत आहे, अशा परिस्थितीत रोपवाटिका सुरू करणे हा एक चांगला व्यवसाय आहे.**

**● रोपवाटिका व्यवसाय-** रोपवाटिका ही अशी जागा आहे जिथे बियाण्यापासून विविध प्रकारची छोटी रोपे तयार केली जातात, या रोपांची विक्री होईपर्यंत, रोपवाटिकेतच काळजी घेतली जाते, रोपवाटिकेत सर्व प्रकारची झाडे जसे की शोभेच्या वनस्पती, औषधी वनस्पती, भाज्या असतात. झाडे, फुलांची झाडे इ. जेव्हा रोपे शेतात किंवा कुंडीत लावण्यासाठी तयार असतात तेव्हा त्यांची विक्री केली जाते.

**● व्यवसायाचे प्रकार:-**

**१. स्ट्रेच प्लांट नर्सरी -** हा रोपवाटिका व्यवसायाचा सर्वात लहान प्रकार आहे. यामध्ये घरे आणि कार्यालयांच्या सजावटीसाठी झाडे विकली जातात. अगदी कमी गुंतवणुकीत सुरुवात करता येते.

**२. व्यावसायिक रोपवाटिका -** या रोपवाटिकेमध्ये मोठ्या प्रमाणात रोपांची निर्मिती केली जाते. येथे तयार केलेल्या रोपावरील बियाणे शेतकऱ्यांना शेतीसाठी विकले जाते. मात्र, ही रोपवाटिका सुरू करण्यासाठी अधिक गुंतवणूक करावी लागणार आहे.



**३. लँडस्केप प्लांट नर्सरी -** याला प्रामुख्याने सेवा म्हणतात, ज्या अंतर्गत नर्सरीमध्ये ग्राहकांना बागकामाची सुविधा दिली जाते, त्यानंतर ग्राहकांच्या घरामध्ये उपलब्ध असलेल्या बागेत त्यांच्या आवडीनुसार रोपे लावली जातात.


**व्यवसाय कसा सुरू करावा:-**

व्यवसाय सुरू करण्यासाठी जमीन आणि झाडे यांच्याशी संबंधित माहिती असणे आवश्यक आहे. यासोबतच परिसरात कोणत्या झाडांना मागणी आहे हे शोधून काढावे. त्यानुसार, रोपे तयार करून, व्यवसाय सुरू करावा.

**● व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक संसाधने:-**

सर्वप्रथम, जमीन लागेल, नंतर सुपीक माती, याशिवाय, रसायने आणि खते आवश्यक आहेत कारण झाडे तयार करताना, त्यांची देखील काळजी घेतली जाते. आवश्यक उपकरणेही लागणार असून, यासोबतच मोठ्या प्रमाणावर व्यवसाय करण्यासाठी कर्मचाऱ्यांचीही गरज लागते.

**● खर्च आणि नफा-** रोपवाटिका सुरू करण्यासाठी जमीन, बी-बियाणे, खते इत्यादींमध्ये गुंतवणूक करावी लागते. अशा परिस्थितीत केवळ काही हजार रुपये खर्चून व्यवसाय सुरू करता येतो, जरी तुम्ही रोपवाटिका सुरू करत असाल तर मोठ्या प्रमाणावर, नंतर रक्कम अधिक असेल. मोठी रोपवाटिका सुरू करण्यासाठी एक ते दीड लाख रुपये लागतील. एकदा का रोपे चांगली विकली गेली, तर आपण दरमहा काही पैसे नक्की कमवू शकतो. मात्र, मोठ्या प्रमाणावर व्यवसाय सुरू करत असाल तर नफा जास्त होईल.



# जनावराला हिरवा चारा देताना घ्या काळजी

**कमी किमतीत पौष्टिक घटक मिळावेत यासाठी दुभत्या जनावरांना हिरवा चारा देणे आवश्यक ठरते. स्थानिक स्वरूपात उपलब्ध असलेल्या हिरव्या चाऱ्याचा वापर करून पशुखाद्याची किंमत कमी करता येते. हिरवा चारा मऊ, चवदार असण्याव्यतिरिक्त, जनावराला पचायलाही सोपा असतो. चाऱ्यात विविध पौष्टिक घटकांचा पुरेशा प्रमाणात समावेश असतो. असा हा हिरवा चारा जनावरांना देताना काय काळजी घ्यायची याविषयीची माहिती घेऊ..**



जनावराला दिला जाणारा चारा रुचकर असावा. चारा एकदम बारीक कुट्टी करून देऊ नये. कुट्टीचा आकार एक ते दोन इंच राहिल्यास जनावरांचे रवंथ उत्तम होऊन चारा व्यवस्थित पचतो. त्याबरोबरच दुधातील फॅटचे प्रमाण उत्तम राहण्यास मदत होते. चारा जशास तसा लांब धाटे न देता कुट्टी करून हिरवा व वाळलेला चारा एकत्र मिसळून द्यावा. यामुळे चाऱ्याचा अपव्यय टाळून पचनीयता वाढते.

जनावरांना चारा खाऊ घालताना जनावराचे शरीर वजन, शरीरवाढ, बैलांची कार्यक्षमता लक्षात घेऊन चारा योग्य प्रमाणात द्यावा. सरसकट सर्वच जनावरांना समान चारा देऊ नये. जनावरांची वर्गवारी करून चारा दिल्यास जनावरांचे आरोग्य उत्तम राहून जास्तीचे उत्पादनही मिळते. आणि चाऱ्याचा अपव्यय टाळला जातो. चारा खाण्यासाठी सर्व जनावरांना योग्य प्रमाणात जागा व चारा उपलब्ध करून द्यावा. जनावरांना केवळ हिरवा चारा किंवा वाळलेला चारा न देता दोन्हींचे योग्य प्रमाणात मिश्रण द्यावे. जनावरांच्या आहारात द्विदल आणि एकदल चाऱ्याचा एकत्रित वापर करावा. व्यवस्थित गव्हाण तयार करून चारा दिल्यास सर्व चारा खाल्ला जातो. जनावरांना चारा दिवसातून केवळ दोन ते तीन वेळा योग्य प्रमाणात खाण्यास द्यावा. यामुळे रवंथ चांगले होऊन चाऱ्याची पचनीयता वाढते व पोषणतत्त्वांचा वाढीव उत्पादनासाठी उपयोग होतो. चारा खाऊ घालण्याच्या वेळा ठरावीक देऊन त्यात अचानक बदल होणार नाही याची काळजी घ्यावी.

सतत केवळ एकाच प्रकारचा चारा न देता दोन ते तीन चारा पिकांचे मिश्रण द्यावे, यामुळे आवश्यक सर्व पोषणतत्त्वे मिळायची शक्यता वाढते. गव्हाणी नेहमी स्वच्छ करून नवीन चारा खाण्यास द्यावा. शेण, लघवी, चिखल पडलेल्या चारा जनावरांच्या आहारात वापर करू नये. कारण घाण वास येणारा चारा जनावरे खाणार नाहीत. अशा चाऱ्यामध्ये अंतरपरोपजीवीचा प्रादुर्भावाची शक्यता वाढते. चारा गव्हाणीमध्ये टाकताना सर्व जनावरांना योग्य प्रमाणात मिळतो का हे पाहावे. भिजलेला, पानांवर दव असणारा चारा वापरू नये. अशा चाऱ्यावरील पाणी निघून गेल्यावर जनावरास द्यावा कारण ओला चारा जनावरे आवडीने खात नाहीत. ओल्या, भिजलेल्या चाऱ्याची कुट्टी करून साठा करू नये. कारण अशा चाऱ्याला कुबट वास येऊन हा चारा जनावरे खात नाहीत. त्याचबरोबर अशा चाऱ्यामध्ये बुरशीची वाढ होऊ शकते.

## ब्राम्हण समाजाबद्दल

८. महापुरुषांची बदनामी करणा-या विरुध्द अजामीनपात्र कडक कायदा निर्माण करुन त्याची अमंलबजावनी करावी.

९. ब्राम्हण समाजातील नागरीकांवर जातीवाचक शिवीगाळ करणा-या विरुध्द अॅट्रॉसिटी अॅक्ट कायदा तात्काळ लागु करावा.

१०. दक्षिन काशी म्हणुन संबोधल्या जाणा-या गोदावरी नदीच्या पात्रात स्वतंत्र अस्ती विसर्जन कुंड, माता पद्मावती घाट तयार करुन संपुर्ण गोदावरी नदीपात्राचे सुशोभीकरण करुन तिर्थक्षेत्र व पर्यटन स्थळाचा दर्जा मंजुर करावा.

११. ब्राम्हण समाजाविषयी भ्रष्ट व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोक प्रतिनीधींकडुन वारंवार देवीदेवतांसह समाजाविषयी वारंवार गरळ ओकणा-या लोकप्रतिनीधींची राज्यशासनातुन त्वरीत हाकालपट्टी करुन त्यांच्यावर अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात यावा.

आदी मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री उपमुख्यमंत्र्यांना देण्यात आले. यावर उपमुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडनवीस यांनी सध्य स्थितीत सुरु करण्यात आलेल्या अमृत योजनेसाठी नुकतेच १५० कोटी रुपये मंजुर केले असुन त्याचा लाभ निश्चितच ब्राम्हण समाज घेईल अशी त्यांनी यावेळी बोलताना ग्वाही दिली.

अखिल भारतीय ब्राम्हण महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. गोविंदजी कुलकर्णी, प्रदेशाध्यक्षा प्रा. मोहिनीताई पत्की, प्रदेश कार्याध्यक्ष निखीलजी लातुरकर, प्रदेश सरचिटणीस प्रा. मधुसुदन मुळे, महिला प्रदेश अध्यक्षा वृषालीताई शेकदार, महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ता संजय कुलकर्णी ( सुपेकर) यांच्या सह अखिल भारतीय ब्राम्हण महासंघाच्या संपुर्ण टिमने वारंवार शासन दरबारी तोंडी व लेखी निवेदने देवुन अनेक वेळा लोकप्रतिनीधींच्या मंत्रालयात भेटी देखील घेतल्या आहेत तरीही शासनाला जाग येत नाही ही खंत आहे. अखिल भारतीय ब्राम्हण महासंघाने महाराष्ट्रासह २२ राज्यात स्वबळावर उपक्रमे राबवुन परभणी, संभाजीनगर, पुणे, दिल्ली सारख्या ठिकाणी भव्य दिव्य असे ब्रह्मोघोगच्या नावाने अधिवेशनही घेतले आहेत. आगामी काळात ब्राम्हण समाजाच्या जिव्हाळ्याच्या मागण्या त्वरीत मान्य करुन इतर समाजासारखा ब्राम्हण समाजालाही समान न्याय द्यावा व त्वरीत भगवान श्री परशुराम अर्थिक विकास महामंडळाची घोषणा करावी अन्यथा आगामी काळातील निवडणुकीत ब्राम्हण समाजालाही गंभीर विचार करावा लागेल असा शेवटी गर्भीत ईशाराही समाजाच्या वतीने देण्यात आला आहे.

## मीरा रोडमध्ये पोलिसावर

हल्ला करणारा आरोपी हा नशेबाज होता. दरम्यान, आरोपींच्या शोधासाठी गुन्हे शाखेचे वेगवेगळे पथक तयार करण्यात आले असून आरोपींचा शोध सुरू आहे.

## युट्युब न्यूज चॅनलच्या तीन कथित

सोहेल आणि नियाज शेख असे खंडणीचा गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हा दाखल असलेल्या तीन पत्रकारांनी भिवंडी शहरातील भादवड परिसरात असलेल्या एका खासगी रुग्णालयाच्या बदनामी करण्याची धमकी देत रुग्णालयाच्या व्यवस्थापकाकडे २५ हजार रुपयांची खंडणी मागितली. परंतु रुग्णालयाच्या व्यवस्थापकाने खंडणीची रक्कम न दिल्यानं त्या खासगी रुग्णालयाचा व्हिडिओ लाईफ इन भिवंडी (LIB) या यूट्यूब चॅनलवर प्रसारित केल्याचे डॉक्टरने दिलेल्या तक्रारीत म्हटलं आहे. इतकंच नाही तर वादग्रस्त व्हिडिओ व्हॉट्सअप आणि फेसबुकसारख्या सामाजिक माध्यमांवरही प्रसारित करण्यात आलाय.व्हिडिओ प्रसारित करण्याची धमकी- भिवंडी शहरात सुमारे दोन डझनहून अधिक युट्यूबर आहेत. या युट्यूबरकडून बनावट न्यूज चॅनल सुरू करून बातम्यांसारखे व्हिडिओ व्हायरल करण्याचा धंदा सुरू केला आहे. अनेक जण स्वतःच्या ओळखपत्रावर स्वाक्षरी करतात. स्वतःसह डझनभर लोकांना पत्रकार म्हणून तोरा मिरवण्याचे ओळखपत्र देत असल्याचे यापूर्वीही उघडकीस आले आहे. हेच लोक पत्रकार असल्याचे नाव घेऊन अवैध कामात गुंतलेल्या लोकांचे व्हिडिओ प्रसारित करण्याची धमकी देऊन पैसे उकळत असल्याचे समोर आले आहे.युट्यूब चॅनलवरून व्हिडिओ डिलीट- रुग्णालय चालविणाऱ्या डॉक्टरच्या तक्रारीच्या अनुषंगाने शांतीनगर पोलिसांनी तिघांविरुद्ध भादंवि कलम ३८५,५०१,३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या रुग्णालयाचा व्हिडिओ इतर चार ते पाच यूट्यूब स्वयंघोषित पत्रकारांनी आपापल्या यूट्यूब चॅनेलवर प्रसिद्ध केला होता. मात्र पोलिसांची कारवाई पाहून त्यांनी संबंधित युट्यूब चॅनलवरून व्हिडिओ डिलीट केला आहे. युट्यूबवर बनावट चॅनेलची टोळी तयार करून नागरिक आणि व्यावसायिकांकडून खंडणी मागूण्याचा धंदा सुरू करण्यात आल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे. अशी प्रकरणे पोलीस प्रशासनाने तपासणे आवश्यक असल्याची मागणी विविध पत्रकार संघटनांनी यापूर्वीच केली आहे.

## शिवसेना-भाजपाच्या

जुनी डोंबिवली, रेतीबंदर, देवीचापाडा भागात जाणारी वाहतूक दिनदयाळ रस्त्यावरील गणपती मंदिरासमोर डावे वळण घेऊन जी. एन. गॅरेज, एलोरा सोसायटीमार्गे सम्राट चौकाच्या पाठीमागील बाजूने इच्छितस्थळी जातील. दिनदयाळ रस्त्याने जाण्यासाठी ठाकूरवाडी, रेतीबंदर, देवीचापाडा, उमेशनगर, आनंदनगर भागातून येणाऱ्या वाहनांना हाॅटेल सम्राट चौक येथे रस्ता बंद करण्यात येणार आहे. ही वाहने सम्राट चौक येथे डावे वळण घेऊन नाना शंकर शेठ मार्गे घनश्याम गुप्ते रस्ता मार्गे इच्छित स्थळी जातील, असे वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांनी सांगितले.

## कल्याण-डोंबिवलीतील

यांच्या निदर्शनास आले आहे. उपायुक्त गुळवे यांच्या आदेशावरुन बाजार परवाना विभागाचे साहाय्यक आयुक्त प्रसाद ठाकुर यांनी आपल्या पाहणी पथकासह कल्याण पश्चिम रेल्वे स्थानका जवळील मुरबाडकर गेस्ट हाऊस जवळील लक्ष्मी बाजारात गुप्तरितीने पाहणी केली. तेथील विक्रेत्यांकडे पालिका परवान्याविषयी विचारणा केली. अशाप्रकारचा परवाना आमच्याकडे नाही. आम्ही मालक गौतम विजय शहा यांच्या आदेशावरुन याठिकाणी व्यवसाय करतो, अशी उत्तरे अधिकाऱ्यांना दिली. अशीच पाहणी अधिकाऱ्यांनी कल्याण पश्चिमेतील वसंत व्हॅलीमधील वृंदावन सोसायटी आवारातील खासगी बाजाराची केली. तेथे शंकर म्हात्रे जागा मालक विनापरवाना बाजार भरवित असल्याचे निदर्शनास आले. ही माहिती साहाय्यक आयुक्त ठाकुर यांनी उपायुक्त गुळवे यांना दिली. खासगी जागा मालक महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६, ३७६(अ), ३७७, ३७८, ३८३, ३८६ नुसार विना परवानाग वस्तुंचा साठा करणे, वस्तुंना विक्री व्यवसायाला नियमबाह्य जागा उपलब्ध करुन देणे, पालिकेची परवानगी न घेता विना परवाना व्यवसाय करणे कायद्याने गुन्हा आहे. उपायुक्त गुळवे यांच्या आदेशावरुन खासगी बाजार भरविणाऱ्या गौतम शहा, शंकर म्हात्रे यांना पालिकेने नोटीस बजावली आहे. नोटीस मिळाल्यापासून सात दिवसाच्या आत व्यवसाय परवान्यासाठी आवश्यक मालमत्ता कर भरल्याची पावती, जमीन मालकीची कागदपत्रे विहीत नमुन्यात बाजार परवाना विभागाकडे दाखल करावीत, अन्यथा आपल्या विरुध्द कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी तंबी नोटिसीत देण्यात आली आहे.

कल्याण, डोंबिवली शहराच्या अनेक भागात जमीन मालकांनी धोकादायक इमारती पाडून तेथील मोकळ्या जागेत बाजार भरविण्याचा धंदा सुरू केला आहे. "पालिका हद्दीत बाजार परवाना विभागाची परवानी

# कल्याण-डोंबिवली महापालिके ची गतिमान ई ऑफिस प्रणाली संथगतीने

कल्याण – कल्याण डोंबिवली पालिकेचे प्रशासकीय कामकाज गतिमानतेने व्हावे म्हणून प्रशासनाने ई ऑफिस प्रणाली सुरू केली आहे. या प्रणालीमुळे झटपट कामे मार्गी लागतील, विकास कामांच्या नस्ती, नागरिकांच्या तक्रारी गतिमानतेने संबंधित अधिकाऱ्यांच्या मंचावर वेळेच पोहोचतील असे नियोजन होते. परंतु, ही प्रणाली तांत्रिक अडचणी, नागरी सुविधा केंद्रातील अपुरे मनुष्यबळ, निवडणूक कामासाठी कर्मचाऱ्यांना लावलेले कर्तव्य यामुळे अतिशय संथगतीने सुरू असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. कल्याण डोंबिवली पालिकेत काही महिन्यांपूर्वी रस्ते बांधकाम नस्ती घोटाळा उघडकीला आल्यानंतर आयुक्त डाॅ. भाऊसाहेब दांगडे यांनी प्रशासनात ई ऑफिस प्रणाली गतिमानतेने राबविण्याच्या सूचना संगणक अधिकाऱ्यांना केल्या. सुरुवातीला पाच विभागांच्या माध्यमातून पथदर्शी प्रकल्प म्हणून ई ऑफिस प्रणाली राबविण्यात आली. या यशस्वीतेनंतर पालिकेतील २५ हून अधिक विभागात ई ऑफिस प्रणाली सुरू करण्यात आली आहे. हस्त पद्धतीने कोणती नस्ती, तक्रार पालिकेत स्वीकारली जात नाही. मंत्रालयातून आलेले टपालही ई ऑफिस प्रणालीतून आयुक्तांपासून संबंधित विभागाकडे पाठविले जाते. ई ऑफिस प्रणालीमुळे यापूर्वी प्रत्येक विभागात स्वीकारण्यात येणारा नागरिकांच्या नागरी समस्या तक्रारी, इतर तक्रार किंवा अन्य अर्ज आता नागरी सुविधा केंद्रात स्वीकारला जातो. हा अर्ज तेथून स्कॅन करुन संबंधित विभागाला पाठविला जातो. अर्जाची किंवा टपाली पाने अधिक असतील तर तेवढा स्कॅनिंगसाठी वेळ जातो. कागदपत्रे स्कॅनिंग झाल्या शिवाय नागरी सुविधा केंद्रातील कर्मचारी टपाल ई ऑफिस प्रणालीतून पुढे पाठविण्याची कार्यवाही करत नाही. दररोज ५० हून अधिक तक्रारी नागरी सुविधा केंद्रात दाखल झाल्या तरी त्या कर्मचाऱ्याला स्कॅनिंग करुन मग पुढे पाठवायच्या आहेत. नागरी सुविधा केंद्रातील कर्मचाऱ्यांना दुपारनंतर प्रभागात निवडणुकीचे काम दिले आहे. दुपारनंतर नागरी सुविधा केंद्रातील स्कॅनिंग करणारे कर्मचारी ई ऑफिस प्रणालीचे काम सोडून निघून जातात. नागरी सुविधा केंद्रात तक्रारी अर्ज, स्कॅनिंगचे ढीग तयार होतात. वेळेत हे अर्ज संबंधित अधिकाऱ्यांच्या मंचावर पोहोचत नाहीत, अशी माहिती एका माहितगाराने दिली. मंत्रालयातून येणारे टपाल अनेक वेळा ४० ते ५० पानांचे असते. ते स्कॅनिंग करुन वरिष्ठांना पाठवायचे म्हणजे कर्मचाऱ्यांसमोर मोठे दिव्य असते.

संपादकीय...



## नैतिकतेचे काय?

यंदाचा शिक्षक दिन देशभरात येत्या मंगळवारी साजरा होईल, तोवर उत्तर प्रदेशातील मुजफ्फरनगर जिल्ह्यातील 'नेहा पब्लिक स्कूल' नावाची तृप्ता त्यागी यांच्या मालकीची शाळा बंद झालेली असेल. याच तृप्ता त्यागींनी एका मुस्लीम विद्यार्थ्यांच्या धर्माचा उल्लेख करत त्याला अन्य मुलांकरवी मारहाण केली याचे ध्वनिचित्रमुद्रणही विसरले गेले असेल आणि राष्ट्रीय मानवी आयोग या प्रकरणाची काय ती दखल घेईल. म्हणजे थोडक्यात, यंदाचाही शिक्षक दिन सालाबादप्रमाणेच साजरा होईल. दर वर्षी ५ सप्टेंबरला साजऱ्या होणाऱ्या शिक्षक दिनाच्या निमित्ताने असलेल्या आणि येणाऱ्या संकटांची जंत्री सादर होते. या साऱ्या समस्या केंद्र आणि राज्य पातळीवरील नेत्यांना तोंडपाठ असतात. मात्र, त्याकडे फारसे लक्ष न देण्याची ते हिंमत करू शकतात, याचे कारण शिक्षक हा एक निरुपद्रवी प्राणी ठरवला गेला आहे. मग दर वर्षी परीक्षेच्या वेळी किंवा उत्तरपत्रिका तपासणीच्या निमित्ताने संपाचे हत्यार उगारले जाते. प्रश्न अटीतटीचा झाला, की शिक्षकांच्या तोंडाला पाने पुसली जातात. संप मागे घेतला जातो आणि 'पुन्हा पहिले पाढे पंचावन्न' होतात. शिक्षण हा देशाच्या भविष्याशी संबंधित असणारा आणि विकासनीतीशी जोडला गेलेला सर्वात महत्त्वाचा विषय. जगातील सर्व विकसित देशांनी शिक्षणाकडे बारकाईने लक्ष दिले. त्यासाठी देशाच्या अर्थसंकल्पातील घसघशीत रक्कम खर्च करण्याचे नियोजन केले. देशाच्या प्रगतीसाठी लागणारे कुशल मनुष्यबळ उभारणीचे हे काम अत्यंत महत्त्वाचे आणि प्राधान्यक्रमाचे असते, याचे भान असल्यामुळेच हे घडले. हे सारे उघडय़ा डोळय़ांनी पाहत असतानाही, राज्यकर्त्यांना मात्र भारत हा जगातील एक महत्त्वाचा प्रगत देश म्हणून नावाजला जात असल्याची खात्री वाटते आहे! जगातील देशांनी तेथील शिक्षणाकडे किती बारीक लक्ष दिले आहे, याकडे नुसती नजर फिरवली, तरी भारतातील उणेपण सहजपणे लक्षात येऊ शकते. वाढत्या लोकसंख्येमुळे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची वाढती संख्या हा आता देशापुढील मोठा प्रश्न झाला आहे. कारण या विद्यार्थ्यांसाठी देशात पुरेसे शिक्षक नाहीत. कारण या शिक्षकांचे वेतन देण्यासाठी सरकारी तिजोरीत पुरेसा निधी नाही.

हे सारे खरेच; परंतु ज्यांनी ज्यांनी शिक्षक म्हणून जबाबदारी स्वीकारली आहे, त्यांनी तरी आपली जबाबदारी नेकपणाने पार पाडणे आवश्यक नाही काय? मुझफ्फरनगरच्या त्या शाळेतील शिक्षिकेच्या मते मुस्लीम मुलांनी येथे शिक्षणच घेता कामा नये. तसेच झालेल्या कृतीबद्दल पश्चात्ताप तर सोडाच, पण साधी माफी मागण्याचेही सौजन्य त्या शिक्षिकेकडे नाही. दुसरीकडे, एका ऑनलाइन शिकवणी वर्गातील शिक्षकाला केवळ 'निवडणुकीत सुशिक्षित उमेदवारांनाच मते द्या' असे विद्यार्थ्यांना सांगितले म्हणून नोकरी सोडावी लागली किंवा पुण्यातील एका महाविद्यालयीन शिक्षकाकडून वर्गातील विद्यार्थ्यांशी गमतीने बोलताना हिंदू देवदेवतांचा अपमान झाला, म्हणून एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात येऊन निलंबित व्हावे लागले. आपापली मते शिक्षकांनी विद्यार्थ्यांसमोर जरूर मांडावीत, पण ती कशा प्रकारे? मूल शाळेत गेल्याच्या दिवसापासून त्याच्या मनावर 'भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत' ही प्रतिज्ञा बिंबवली जाते. नुसते पाठांतर नव्हे, तर त्याच्या अर्थासह ती समजून देण्याची जबाबदारी कोणाची, तर अर्थातच शिक्षकाची. पण जर त्यांनाच या प्रतिज्ञेचा अर्थ उमगत नसेल, तर मग त्या विद्यार्थ्यांची त्यात काय चूक बरे! अन्य सेवा क्षेत्रांप्रमाणे शिक्षकाचे काम काही उत्पादक नसते. मात्र, त्याचे महत्त्व दीर्घकालीन असते. आपण एका पिढीला सज्ञान करून त्यांच्यामध्ये गुणात्मक बदल घडविण्यास कारणीभूत असणारे घटक आहोत, याचे भान सुटले, की शिक्षकाच्या हातून अशा मारहाणीच्या घटना घडतात. हे मान्यच करायला हवे की शिक्षकांना अध्यापनाव्यतिरिक्त कामांचा फारच ताण असतो. रोज विद्यार्थ्यांना पोषण आहार देणे, त्यासाठीचा शिधा विकत आणणे, त्याच्या विनियोगाचे तपशील लिहिणे, गावातल्या जत्रा आणि यात्रांसारख्या उपक्रमांचे संचलनही त्यांनाच करावे लागते. शालाबाह्य मुले, निरक्षरांचा शोध यांसारख्या सर्वेक्षणांची जबाबदारी त्यांचीच, वर्गातील विद्यार्थ्यांची पटसंख्या टिकवून ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांचा शोध घेणे, विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे लक्ष देणे, एक ना दोन.. नानाविध कामांचा बोजा शिक्षकांवरच टाकला जातो. हे सारे कमी म्हणून की काय, निवडणूक आणि जनगणनेच्या कामासाठी हुकमी काम करणारे, ते शिक्षकच. हे सारे करून जर वेळ उरलाच, तर अध्यापन.

याचे कारण देशात शिक्षकांची पुरेशी संख्या नाही. महाराष्ट्रापुरतेच बोलायचे, तर २०१९ मध्ये सरकारने राज्यात प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांची ३० हजार पदे भरण्याची घोषणा केली.

# एक एके एक..

'एक देश, एक निवडणूक' समजा झालेच, तर याची अखेर एक पक्ष आणि एक नेता या वास्तवात होऊ शकते..

विरोधकांस त्यांचा पैस सोडाच; पण वृत्तमथळय़ांपासूनसुद्धा कसे वंचित ठेवावे हे विद्यमान केंद्र सरकारकडून शिकण्यासारखे आहे. मुंबईत नव्या 'इंडिया' आघाडीच्या तिसऱ्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर विशेष संसद अधिवेशनाची घोषणा करणे आणि त्यात 'एक देश एक निवडणूक' संकल्पनेचे पिल्लू सोडणे हा याचाच एक धडा. वास्तविक केंद्रीय सत्ताधारी आणि राज्याराज्यांतील त्यांची नवी आयात पिलावळ 'इंडिया' आघाडी किती अर्थहीन हे सांगण्यासाठी जिवाचे रान करीत असताना परत त्यांना निष्प्रभ करण्यासाठी इतका आटापिटा सत्ताधीशांना का करावा लागावा हे अनाकलनीय ठरते. विरोधकांच्या बैठकीची कार्यक्रम पत्रिका पळवून नेली म्हणजे विरोध नाहीसा होईल असा काहीसा सत्ताधाऱ्यांचा विचार त्यातून दिसतो. म्हणून मग संसदेचे अचानक अधिवेशन आणि हा 'एक देश एक निवडणूक'चा फुगा! मणिपूरची आग अद्यापही शांत झालेली नसताना आणि सीमेवरील चिनी पाहुणे आपले चंबूगवाळे आवरण्याची अद्यापही काही लक्षणे नसताना त्या महत्त्वाच्या विषयांवर कधी संसद अधिवेशन बोलवावे असे सत्ताधीशांस वाटले नाही. पण विरोधकांच्या आघाडीस धक्का देण्यासाठी मात्र संसद अधिवेशन हवे असे त्यांस वाटते यातच विद्यमान सत्ताकारणाच्या मर्यादा दिसून येतात. आता नेहमीच्या अधिवेशनांतून जे काही साध्य करता आले नाही, येत नाही ते वैधानिक अमृत या विशेष पाचदिवसीय अधिवेशनात निघेल ही आशा. राहता राहिला मुद्दा 'एक देश एक निवडणूक' हा.




'समान नागरी कायदा' वा 'नागरिकत्व कायदा सुधारणा (सीएए)' या मुद्दय़ांचे जे झाले तेच या 'एक देश एक निवडणूक' या घोषणेचे होण्याची शक्यता दाट आहे. नुसतीच चर्चा आणि असे करण्याची धमकी आणि ती धमकी हीच निवडणूक कार्यक्रम पत्रिका असा या सरकारचा खाक्या राहिलेला आहे. 'समान नागरी कायदा' या मुद्दय़ाचे पिल्लूही असेच सोडून दिले गेले. त्यावर सत्ताधीशांना अपेक्षेप्रमाणे गदारोळ उडाला आणि दूरचित्रवाणीवरील वृत्तनिवेदकी फौजेच्या मदतीने हा मुद्दा हवा तितका तापविलाही गेला. पण पुढे काहीही झाले नाही. ते होणारही नव्हते. कारण ज्या क्षणी नागालँड आदी प्रदेशांतील आदिवासींस 'समान नागरी कायद्या'तून वगळण्याचे आश्वासन केंद्रीय गृहमंत्र्यांनी दिले त्याच क्षणी समान नागरी कायद्याचा मुद्दा निकालात निघाला. विद्यमान सत्ताधीशांवर विचारशून्य श्रद्धा असलेले समाजमाध्यमी गणंग सोडले तर आता याबाबत फार कोणास आशाही नाही. याचे कारण पारसी, शीख, आदिवासी अशा अनेकांस यातून सवलत द्यावी लागणार आहे. खेरीज जबर कर वाचवणारे 'हिंदू अविभक्त कुटुंब' कायद्याचे गबर लाभार्थी वेगळेच. त्यामुळे समान नागरी कायद्यात देशपातळीवर 'समान' असे फारसे काही राहात नाही. त्याच मार्गाने आता 'एदेएनि' मुद्दा निघाल्याचे दिसते. तथापि एक देश एक निवडणूक होणार की नाही, झाल्यास कशी/कधी होणार यापेक्षाही २०२४ चा अश्वमेध आपण जणू जिंकलाच अशा थाटात वावरणाऱ्या सत्ताधीशांना निवडणुकीच्या जेमतेम सहा-आठ महिने आधी हे पिल्लू सोडावे का लागते; हा यातील कळीचा मुद्दा आहे. म्हणजे असे कोणते संकट विद्यमान सत्ताधीशांसमोर आहे की जे टाळण्यासाठी 'एदेएनि'ची मागणी त्यांस करावी लागते?

नेतृत्वाच्या मर्यादा हे याचे उत्तर. एकच एक चेहरा ही भाजपची मर्यादा आहे. निवडणुका कोणत्याही असोत भाजपकडे 'दुसरा' कोणताही पर्याय नाही. अपवाद एकटय़ा उत्तर प्रदेशचा. अन्यत्र या चेहऱ्याच्या आकर्षकतेच्या मर्यादा नुकत्याच पार पडलेल्या कर्नाटक विधानसभा निवडणुकांनी उघडय़ा पाडल्या आणि येऊ घातलेल्या पाच राज्यांतील निवडणुकांत याच कर्नाटकी निकालाची पुनरावृत्ती होणारच नाही, असे नाही. ज्याप्रमाणे सत्तर-ऐंशीच्या दशकातील काँग्रेसने आपले राज्यनेतृत्व खच्ची केले त्याचप्रमाणे सध्याच्या भाजपने राज्याराज्यांतील आपल्या नेत्यांस छाटून टाकलेले आहे. त्यामुळे आपल्यामागे कोणीच नाही हे जसे अखेरीस काँग्रेसला कळले ते आता भाजपस दिसून येत आहे. फरक इतकाच की काँग्रेसला ही अवस्था येण्यास पन्नास वर्षे घालवावी लागली. भाजपने दहा वर्षांतच हे करून दाखवले. तेव्हा राज्याराज्यांत आपल्याकडे नेतृत्वाचे चेहरे नाहीत आणि केंद्रातील एकमेव चेहऱ्याचाही जनतेस काही प्रमाणात का असेना पण शिणवटा आलेला हे वास्तव समोर आल्याने त्यावर मात करण्याचा मार्ग म्हणजे 'एक देश एक निवडणूक'. एकदाच काय ते उरकून टाकायचे. यातील खर्च वाचेल, सारखी निवडणुकांची कटकट नाही वगैरे मुद्दे सामान्यांस खरे आणि विश्वासार्ह वाटतात. पण त्याने भागणारे नाही. खर्चच वाचवायचा तर किती तरी अन्य विधायक मार्ग उपलब्ध आहेत. पण सरकारला ते नको. त्याऐवजी हे नवे पिल्लू. पण त्याची वाढ होणे अवघड.

कारण आजमितीस देशात डझनभर राज्यांत भाजपचे शासन नाही. त्या राज्यांतील मुख्यमंत्र्यांस केंद्राचे बुगुबुगु कानावर पडल्यावर गुमान होकारार्थी मान हलवण्याची सक्ती नाही. तेव्हा त्यांचे काय करणार? हे एका टप्प्यात होणारे नाही असे काही केंद्रीय नेते म्हणतात. तसे ते झाले तरी काही प्रश्न उरतात. जसे की समजा सर्व निवडणुका खरोखरच एकाच वेळी झाल्या आणि काही राज्यांत वा केंद्रातही कधी अशी परिस्थिती उद्भवली की कोणा एका पक्षाला बहुमत नाही तर काय करणार? आघाडी हे त्याचे उत्तर असेल. पण स्थिर सरकार देईल अशी आघाडीही समजा स्थापन होऊ शकली नाही तर काय? राष्ट्रपती शासन? म्हणजे केंद्राहाती राज्याची सूत्रेही द्यायची! सध्याच्या लोकशाहीत सत्ताधाऱ्यांवर अविश्वास ठराव आणून आहे ते सरकार पाडण्याची सुविधा विरोधकांस आहे. 'एदेएनि' पर्यायात तसे असेल काय? अशा ठरावाद्वारे विद्यमान सरकार पडले आणि विरोधकांनाही सरकार स्थापन करता आले नाही तर सध्या निवडणुका हा पर्याय उपलब्ध आहे. 'एदेएनि' अमलात आल्यास तो पर्याय नसेल. मग काय उर्वरित काळ पुन्हा केंद्राहाती राज्याची सूत्रे द्यायची? विद्यमान केंद्रीय सत्ताधारी या प्रश्नाचे उत्तर मनातल्या मनात तरी 'हो' असे देतील. कारण तीच तर या मंडळींची सुप्त इच्छा आहे. सर्व देशाची सत्ता आपल्या हाती हवी ही मनीषाच या प्रस्तावाच्या मुळाशी आहे. एक देश, एक निवडणूक याच्या परिणतीची मालिका अखेर एक पक्ष आणि एक नेता या वास्तवावर थांबेल हे जाणण्यासाठी भविष्यवेत्ता असण्याची गरज नाही. याखेरीज 'एक भाषा' हा मुद्दा रेटणे सुरू आहेच.

त्यात या धोरणाची संभाव्य रूपरेषा ठरविण्यासाठी विद्यमान सरकारला सापडून सापडून सापडले कोण? तर माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद. ते पदावर असतानाही चेहऱ्यावरचा उपकृततेचा तवंग कधी लपवू शकले नाहीत. गृहस्थ किती विद्वान आहेत हेही सर्व जाणतात. त्यांच्या जोडीला त्याच वर्गवारीतील काही नोकरशहा दिले जातील. त्यामुळे त्यांचा अहवाल काय असेल याचा अंदाज बांधणे अवघड नाही. या सरकारचे लोकशाही-प्रेम जगजाहीर आहे. त्यामुळे 'एदेएनि' या प्रस्तावामागील खरा विचार त्यांस लपवता येणे अवघड. आमचे 'सर्व काही एक आणि एकमेकाद्वितीय' ही मानसिकता एक देश एक निवडणूक प्रस्तावामागे आहे. एक एके एक आणि एक दुणेही एकच हे राजकीय वास्तव जोपर्यंत बदलले जात नाही तोवर अशी पिल्ले सोडणे सुरूच राहील.




# 'इंडिया'चे 'अण्णा' कोण?

सत्ताधारी नेतृत्वाच्या कथित उपद्रवाची तीव्रता नागरिकांस जाणवत असेलच असे नाही. म्हणून त्यांच्या भावनेस स्पर्श करू शकेल असा कार्यक्रम 'इंडिया'स सादर करावा लागेल..

लोकशाहीच्या सौष्ठवासाठी सशक्त विरोधी पक्ष हवा, हे खरेच. सशक्त विरोधी पक्ष हा सुदृढ सत्ताधाऱ्यांस दांडगाई करू देत नाही. याचे उत्तम उदाहरण म्हणजे सध्या सत्ताधारी असलेला भाजप. संपूर्ण देश असो वा महाराष्ट्रासारखे एखादे राज्य. भाजपने विरोधी पक्षाची भूमिका मन लावून केली. ते पाहूनच विरोधी पक्षांत बराच काळ काढलेल्या भाजपस मतदारांनी सत्तासंधी दिली. पण ती साधल्यानंतर मात्र जे कार्य आपण नेटकेपणाने केले ते अन्य कोणास करताच येऊ नये, अशा प्रकारचे राजकारण भाजपने केले. आपले राजकीय विरोधक आणि टीकाकार यांच्याबाबत भाजपची वर्तणूक सहिष्णुतेच्या अभावाची निदर्शक होती या आरोपात तथ्य नाही, असे म्हणता येणार नाही. त्याचा परिणाम असा की एके काळी भाजपपेक्षाही अधिक तगडय़ा काँग्रेसविरोधात विरोधकांची एकी होण्यासाठी पाच दशके जावी लागली; पण भाजपला, त्यातही नव्या भाजपस.. मात्र यासाठी जेमतेम दहा वर्षे पुरली. विरोधकांस एकमेकांजवळ आणण्यासाठी काँग्रेसला आणीबाणी लादावी लागली. भाजपस त्याची गरजच लागली नाही. असे काहीही न करता आपले विरोधक एका छताखाली येतील असे राजकारण भाजपने केले. गेली दहा वर्षे विविध निवडणुकांतून भाजपकडून यथेच्छ लाथाडून घ्यावे लागल्याने भाजपग्रस्त विरोधक अखेर एकत्र आले आणि त्यातून 'इंडिया' या आघाडीचा जन्म झाला. कोणत्याही बलदंडाकडून होते ती आपल्या प्रतिस्पर्ध्यास कमी लेखण्याची चूक सत्ताधारी भाजपने सुरुवातीस केली. पण मामला वाटतो तितका किरकोळ नाही, हे लक्षात आल्यावर या 'इंडिया'कडे भाजप गांभीर्याने पाहू लागला. त्याचमुळे मुंबईत ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबरास होणाऱ्या 'इंडिया'च्या या बैठकीकडे भाजप लक्ष ठेवून असेल. हा झाला पक्षीय राजकारणाचा विचार. तथापि त्यापलीकडे जात मतदारांस आकृष्ट करेल असे काही या बैठकीतून निघेल काय अथवा त्या दिशेने विरोधकांची वाटचाल कायम राहील काय हा प्रश्न राजकीय हितापेक्षा अधिक महत्त्वाचा ठरेल.

त्यासाठी विरोधकांच्या आघाडीस यापुढील टप्प्यात काही एक कार्यक्रम मतदारांसमोर मांडावा लागेल आणि त्याच्या अंमलबजावणीबाबतचे गांभीर्य आपल्या सामूहिक वर्तनातून सिद्ध करून दाखवावे लागेल. याचे कारण असे की केवळ अमुक एखादी व्यक्ती नको ही भावना राजकीय पक्षांची असू शकेल. पण कोटय़वधी मतदारांची ती भावना आहे काय हा यातील महत्त्वाचा प्रश्न. तो पडतो याचे कारण राजकीय विरोधकांस एखाद्या व्यक्तीचा जितका उपद्रव वाटत असेल तितक्या प्रमाणात त्या कथित उपद्रवाची तीव्रता नागरिकांस असेलच असे नाही. म्हणून नागरिकांच्या भावनेस स्पर्श करू शकेल असा काही कार्यक्रम विरोधकांच्या 'इंडिया'स सादर करावा लागेल. यात भावनेचा उल्लेख अनवधानाने झालेला नाही. तो केला याचे कारण भारतीय निवडणुकांत बुद्धीपेक्षा भावनाच निर्णायक ठरते हे आतापर्यंत अनेकदा सिद्ध झालेले आहे. भावनाभराने कललेल्या जनमताचे समर्थन नंतर त्या त्या पक्षांचे खंदे समर्थक वा भक्त बुद्धीच्या आधारे करू पाहतात. ते खपून जातेही. त्यामुळे त्या बुरख्याआडचा भावनाकल्लोळ दडलेला राहतो. हे सत्य लक्षात घेता 'इंडिया'स आधी समस्त मतदारांच्या भावनांस स्पर्शून जाईल असा काही कार्यक्रम द्यावा लागेल. सत्ताधारी भाजपने या खात्यावर पुरेशी बेगमी करून ठेवलेली आहे. त्यासाठी राम मंदिर ते मुसलमानांबाबत चतुर द्वेषाच्या पेरणीतून हिंदूत्वाचे एकगठ्ठीकरण असे अनेक पर्याय सत्ताधाऱ्यांस आहेत.

म्हणून विरोधकांसमोरचे आव्हान अधिक खडतर आहे. वाढती बेरोजगारी, कमालीची दरवाढ, काही उद्योगपतींचे नशीब फळफळणे इत्यादी मुद्दे विरोधकांस अशा पद्धतीने सादर करावे लागतील की ज्यामुळे त्याचा संबंध आपल्या जगण्यातील हलाखीशी आहे असे सामान्यांस वाटेल. या संदर्भात २०१२ पासून भाजपने तत्कालीन सरकारातील कथित आर्थिक घोटाळय़ांचे नाते नागरिकांस तेव्हा भेडसावणाऱ्या महागाईशी कसे जोडले याचे अध्ययन 'इंडिया'च्या नेत्यांनी जरूर एकदा करावे. वास्तविक भाजपस यातील भ्रष्टाचाऱ्यांचे ना काही देणे होते ना महागाईशी काही घेणे. म्हणजे कथित दूरसंचार घोटाळय़ातील आरोपी आणि त्यांचा द्रमुक पक्ष यांनी आपल्याशी हातमिळवणी करावी यासाठी भाजपच्याच कोणी चेन्नईत चरणधूळ झाडली हे सर्व जाणतात. तसेच त्या वेळी ४०० रुपयांवर गेलेल्या गॅस सिलिंडरच्या सध्या १४०० रुपयांच्या किमतीतून २०० रु. कमी करून औदार्याचा आव कसा आणता येतो हेही सर्व पाहतात. तथापि या सगळय़ा विषयांचे निवडणुकीच्या मुद्दय़ांत रूपांतर करता येते किंवा काय यावर राजकीय पक्षांचे यशापयश ठरत असते. यासाठी आवश्यक कौशल्य आपल्याकडे आहे हे या 'इंडिया'च्या घटक पक्षांस दाखवून द्यावे लागेल. त्याच बरोबरीने निवडणूक रोखे, जम्मू-काश्मीरचे ३७० कलम रद्द करण्याचा निर्णय इत्यादी विषयांवर आपली भूमिका काय हे या मंडळींस स्पष्ट करावे लागेल. विरोधी पक्षात असताना भाजप केंद्रीय अन्वेषण विभागादी यंत्रणांच्या स्वायत्ततेबाबत सातत्याने कंठशोष करीत असे. तथापि सत्ता मिळाल्यानंतर भाजपचे मत बदलले. उलट सीबीआयच्या जोडीने भाजपने सक्तवसुली संचालनालयासारखे नवेच अस्त्र विकसित केले. या दोन अस्त्रांच्या बेछूट माऱ्यासमोर आज विरोधकांची मोठीच धूळधाण उडालेली दिसते. या सरकारी यंत्रणाचे शस्त्रीकरण (वेपनायझेशन) हा लोकशाहीसमोरील सर्वात मोठा धोका आहे असे विरोधक म्हणतात. त्यात तथ्य नाही, असे कोणीच म्हणणार नाही. परंतु या यंत्रणांस वेसण घालण्यासाठी आपण काय करू इच्छितो हे विरोधकांस सांगावे लागेल. शेती, उद्योग अशा अनेक आघाडय़ांवर आज देश म्हणून आपला संघर्ष सुरू आहे. त्याबाबत आपली भूमिका 'इंडिया'ने स्पष्ट करणे गरजेचे. याचे कारण आज बेरोजगारी जर देशामोरील सर्वात मोठी समस्या असेल तर तिचे उत्तर सक्षम उद्योग आणि फलदायी शेतीतूनच मिळणार आहे. त्यासाठी आपल्या स्वतंत्र पर्यायांची मांडणी विरोधकांस करावी लागेल. काँग्रेस आणि डाव्यांच्या प्रेमापोटी काही उत्साही स्वयंसेवी संस्था विरोधकांस साथ देताना दिसतात. या अशा बोलघेवडय़ांमुळे माध्यमांतून चर्चा जरूर होते. पण या मंडळींमुळे मते मिळतातच असे नाही.

त्याऐवजी मते देणाऱ्यांस आकर्षक वाटू शकेल असा एखादा वरकरणी राजकारणबाह्य चेहरा खूप महत्त्वाचा ठरतो. भारतीय मतदारांच्या भावनात्मक मानसिकतेशी याचा संबंध आहे. त्याचमुळे सुरुवातीस महात्मा गांधी, आणीबाणीनंतरच्या काळात जयप्रकाश नारायण आणि २०१२ नंतर यांची बोन्साय आवृत्ती असलेले अण्णा हजारे यांची आंदोलने महत्त्वाची ठरली. यातील महात्मा गांधी आणि जयप्रकाश नारायण यांच्या निरलसतेविषयी काही कोणाचे दुमत असणार नाही. अण्णांच्या ठायी मात्र सगळय़ाचीच तशी बोंब. पण रा. स्व. संघाच्या दुलईमुळे ते उघडे पडले नाहीत. त्या वेळी मनमोहन सिंग सरकारविरोधात नाराजीचे एकत्रीकरण करण्यास अण्णांचा चांगलाच उपयोग झाला. तो कार्यभाग साधला गेल्यावर आणि आता कोणी विचारणारे नसल्याने अण्णा आपल्या यादवबाबा मठीत गुमान पडून असतात. तथापि तसे ते निरुद्योगी असले तरी त्यांची अवस्था आतली दारू संपलेल्या फटाक्यासारखी आहे. त्यांचा काही उपयोग नाही. पण इंडियास जनमत आपल्याकडे वळवण्यासाठी अण्णांसारखे एखादे बुजगावणेही पुढे करावे लागेल. 'तुमचे 'जेपी' कोण' असा प्रश्न या 'इंडिया'च्या धुरीणांना अलीकडे वारंवार विचारला जातो. तथापि सद्यःस्थितीत 'जेपीं'पेक्षा 'इंडिया'स अण्णांची अधिक गरज आहे. ती गरज हे कशी भागवतात वा निरुपयोगी ठरवतात यावर त्यांचे यशापयश ठरेल.

## 5 कोटींची व्हेल माशाची उलटी विक्री करणाऱ्याला ठोकल्या बेड्या, काय आहे प्रकरण?




पुणे : कोयता टोळीची दहशत कायम असतानाच पुण्यात एक नवीन गुन्ह्याची घटना उघडकीस आली आहे. व्हेल माशाची उलटी विकणाऱ्या एकाला पोलिसांनी बेड्या ठेकल्या आहेत. पोलिसांनी आरोपीकडून 5 कोटींची व्हेल माशाची उलटी जप्त केली आहे. विश्वनाथ रतन गायकवाड ( वय 38 ) रा. 469/9 कात्रज खोपडे नगर गुजरवाडी, पुणे असं अटक करण्यात आलेल्या आरोपीचं नाव आहे.व्हेल माशाच्या उलट्यांची विक्री : पुण्यातील गुडलक कॅफेच्या मागील बाजूस व्हेल माशाच्या उलट्यांची विक्री होत असल्याची माहिती पोलिसांना गुप्त माहिती मिळाली होती. माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीला अटक करत त्याच्याकडून पाच कोटी रुपयांची व्हेल माशाची उलटी जप्त केली आहे. त्यामुळं या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फर्ग्युसन रोडवरील गुडलक हॉटेलच्या मागे एक व्यक्ती व्हेल माशाची उलटी विकत असल्याची माहिती पोलिस नाईक सचिन गायकवाड यांना मिळाली.तब्बल पाच कोटींची उलटी : त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक विपीन हसबनीस यांना ही माहिती देण्यात आली. यावेळी तत्काळ उपनिरीक्षक महेश भोसले संबंधित ठिकाणी धाव घेतली. यावेळी संशयित आरोपीला इथं काय करत आहे? असा प्रश्न विचारल्यावर त्याला उत्तर देता आले नाही. त्यानं उडवा उडवाउडवीची उत्तरं दिल्यामुळं पोलिसांनी त्यांच्या बॅगची झडती घेतली. त्यावेळी त्याच्यात पाच कोटी किमतीची व्हेल माशाची उलटी सापडली. ही कारवाई पोलिस उपायुक्त संदीपसिंग गिल, वरिष्ठ पोलिस निरीक्षक विपीन हसबनीस, पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रय सावंत, अमलदार बोरसे, धनश्री सुपेकर, अमलदार रोहित पथरूट, महेश काळे, धनाजी माळी, दशरथ गभाले यांच्या पथकानं केली. व्हेलच्या उलटीची तस्करी का : व्हेल मासा खोल समुद्रात राहतो. या माशाच्या कोणत्याही भागाचा व्यावसायिक वापर करणा हा कायद्यानं गुन्हा आहे. व्हेल मासा शारीरिक प्रक्रियेतून उलट्या करतो. याच उलटीला अंबर ग्रीस म्हणतात. व्हेल माशाची उलटी पाण्यात विरघळत नसल्यामुळं ती पाण्यावर तरंगू लागतो. या उलटीचा वापर औषध, परफ्यूम बनवण्यासाठी केला जातो, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे.

## वीजचोरी रोखण्याचे महावितरणपुढे आव्हान

वसई-विरार शहरात वीजचोरीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. चोरट्यांनीसुद्धा नवनवीन प्रकारच्या शक्कल लढवून वीजचोरी करण्यास सुरुवात केली आहे. वीजचोरी रोखण्यासाठी महावितरणकडून सातत्याने प्रयत्न केले जातात. मात्र ते प्रयत्न अपयशी ठरताना दिसत आहेत. अलीकडेच महावितरणने एकाच दिवशी ८४ वीजचोरीच्या घटना उघडकीस आणल्या आहेत. यावरूनच वीजचोरांची व्याप्ती फारच मोठी असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे या वीजचोरांना रोखण्याचे मोठे आव्हान महावितरणपुढे आहे. महावितरणच्या वसई मंडळाकडून वसई-विरारसह वाडा शहरास वीजपुरवठा केला जात आहे. घरगुती, औद्योगिक, व्यावसायिक, कृषी, नागरी सेवा, पथदिवे, असे सुमारे १० लाखांहून अधिक वीज ग्राहक आहेत. दिवसेंदिवस वीज ग्राहकांची संख्या वाढत आहे. शहरात वर्षाला सुमारे अडीच ते तीन हजार मेगा युनिट इतक्या विजेची मागणी आहे. परंतु, ग्राहकांच्या तुलनेत सुरळीत वीजपुरवठ्यासाठी ती अपुरी आहे. असे असताना शहरात वीजचोरांनी धुमाकूळ घातला आहे. दिवसेंदिवस चोरीची वीज वापरणाऱ्यांची संख्या वाढत आहे. नायगाव, वसई, नालासोपारा, विरार अशा भागांत अनधिकृत बांधकामे व



चाळी उभ्या राहत आहेत, अशा ठिकाणी तारांचा गुंता अधिक असल्याने त्यातून चोरून वीजजोडणी घेतली जाते. याशिवाय मीटरमध्ये फेरफार करून, मुख्य वीजजोडणीच्या सेवा वाहिनीला टॅपिंग करून, विद्युत वाहिनीवर आकडे टाकून, अनधिकृत वीज वापर करणे, असे प्रकार सुरूच असतात. त्यामुळे महावितरणची कोट्यवधी रुपयांची वीजचोरी होत आहे. मागील दीड वर्षांत महावितरणने सुमारे तीन हजार वीजचोरीच्या घटना उघडकीस आणल्या आहेत. महावितरणकडून सातत्याने कारवाया करूनही वीजचोरीचे प्रमाण काही थांबण्याचे नाव घेत नाही. याउलट बदलत्या तंत्रज्ञानाच्या काळात वीजचोर ही स्मार्ट पद्धतीने वीजचोरी करू लागले आहेत. वीज मीटरचे सील तोडून त्यात उपकरण बसवून रिमोट कंट्रोलद्वारे वीजचोरी केली जात आहे. मागील वर्षी कामण आणि माजिवली येथील कारखान्यात रिमोट कंट्रोलद्वारे सुमारे १० कोटी रुपयांची वीजचोरी झाल्याचे महावितरणच्या भरारी पथकाने उघडकीस आणले होते. असे प्रकार रोखण्यासाठी महावितरणने मशीन, ॲक्यु चेक मशीन, झेरा मशीन यंत्राचा वापर करून मीटर तपासणी सुरू केली आहे. असे असतानाही मीटरमध्ये फेरफार करण्याचे काम सुरूच आहे. सध्या साधे मीटर असल्याने त्यातून सहजपणे फेरफार करून वीजचोऱ्या केल्या जात आहेत. तर काही मीटर सदोष असल्याने त्यात वीज वापराची नोंदणी योग्य पद्धतीने होत नसल्याने महावितरणला आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. यावर उपाय म्हणून महावितरणने स्मार्ट मीटर बसविण्याची घोषणा केली होती. या स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांच्या वीज वापरावर लक्ष ठेवता येणार आहे. एखाद्या ग्राहकाने वीजचोरीचा प्रयत्न केला तरी त्याची माहिती तातडीने महावितरणला कळू शकणार आहे. त्यामुळे छुप्या मार्गाने होणाऱ्या वीजचोरीला आळा घालण्यास मदत होणार होती. स्मार्ट मीटर बसवण्यासाठी महावितरणने अंदाजपत्रक तयार करून वरिष्ठ कार्यालयास सादर केले आहे. त्याचीसुद्धा अंमलबजावणी आजपर्यंत झाली नसल्याने वीजचोऱ्या थांबणार कशा? असा प्रश्न निर्माण होऊ लागला आहे. महावितरणकडून धडकेबाज कारवाया तर होत आहेत. कारवाईनंतर खरे तर वीजचोरी होण्याचे प्रकार कमी होणे अपेक्षित होते. परंतु, चोरट्यांनी नवीन मार्गाचा अवलंब करून विजेचा अनधिकृत वापर सुरूच ठेवला आहे. खरे तर आर्थिक तोटा कमी करण्याच्या दृष्टीने वीजचोऱ्या रोखणे एक प्रकारे मोठे आव्हान आहे. हे आव्हान महावितरणने शिताफीने पेलले तर छुप्या मार्गाने वीजचोऱ्या करणाऱ्यांची मुस्कटदाबी करता येणार आहे.

तसेच जे नियमितपणे वीज देयक भरत आहेत, अशा ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा करणे तसेच वीजचोरीमुळे होणारे नुकसान टाळण्यास मदत होईल.

वीज चोरांविरोधात कारवाईची तत्परता का नाही? वीज देयकांच्या थकबाकीमुळे महावितरणला मोठा फटका बसतो. एखाद्या सर्वसामान्य वीज ग्राहकाने अवघ्या एका महिन्याचे वीज देयक थकविले तरी त्याचे वीज मीटर काढून वीजपुरवठा खंडित केला जातो. त्या ग्राहकाला वीज देयक भरल्यानंतरही मीटर बसवून घेण्यासाठी महावितरणच्या कार्यालयात खेटे मारावे लागतात. जसे महावितरण थकीत वीज देयकांच्या संदर्भात अगदी तत्परतेने कारवाईसाठी पुढे सरसावते तशीच तत्परता वीजचोरी पकडण्यासाठी का दाखविली जात नाही. अनेकदा वीज कर्मचारी यांच्या संगनमताचे वीजचोऱ्या होत असल्याचे आरोप होतात. त्यामुळे वीजचोऱ्या करणारे मोकाटच राहतात. याशिवाय बाह्यपद्धतीने (कटआउटद्वारे) चोरीची वीज जोडणी घेतात, त्यांचाही शोध महावितरणने घ्यायला हवा तरच वीजचोरीला आळा बसण्यास मदत होणार आहे. वीज यंत्रणेवर भार

वीज ग्राहकांच्या वाढत्या संख्येमुळे विजेची मागणी वाढली आहे. यामुळे वीजपुरवठा करणारी उपकेंद्रे, रोहित्र व इतर विद्युत यंत्रणेवर क्षमतेपेक्षा अधिक भार येऊ लागला आहे. अशा स्थितीत वीजग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. असे असताना दुसरीकडे आधीच अतिभार असलेल्या यंत्रणेवर वीजचोरांमुळेसुद्धा भार पडत आहे.

## जिल्हास्तरीयतांगसूडो (कोरियनकराटे )स्पर्धे त मिरा भाईंदरच्या खेळाडूं नी मारली बाजीसमर्थ तांबेचा पुन्हा एकदा सुवर्ण पंच राज्यस्तरीय स्पर्धे त निवड





भाईंदर - २७ ऑगस्ट २०२३ रोजी तांगसूडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या संलग्ननाने समता विद्यामंदिर, कांदिवली येथे १०वी जिल्हास्तरीय तांगसूडो (कोरियनकराटे) स्पर्धा पार पडली. या स्पर्धेमध्ये एकूण ४००हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये फाईट आणि पूमसे आणि व्हेपनपूमसे अश्या तीन प्रकारच्या स्पर्धा आयटीएफ तांगसूडो स्पोर्ट्स फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या नियमानुसार पार पडल्या. स्पर्धेमध्ये स्पोर्ट्स इंडिया कराटे अकॅडेमि मिराभाईंदर यांच्या २४ खेळाडूनी २५ सुवर्ण, २० रौप्य आणि १२ कांस्य अशी एकुण ५७ पदके जिंकली आहेत. या सर्व मिराभाईंदर मधील खेळाडूंची निवड राज्यस्तरीय स्पर्धेत करण्यात आली आहे. समर्थ तांबे याने विशेष कामगिरी करत २सुवर्ण आणि १रौप्यपदक जिंकले. त्या सोबत भीम राजभर, सचिन चव्हाण, अर्जुन राजभर, आकाश, तृप्ती, यांनी देखील यश संपादन केले. सर्व खेळाडूंना मास्टर सुभाष मोहिते, मास्टर विनोद कदम यांचे विशेष प्रशिक्षण लाभले आहे.

## २५ वर्षीय एअरहोस्टे सची गळा चिरून हत्या, पोलिसांनी एकाला घेतलं ताब्यात

मुंबईत एका २५ वर्षीय एअरहोस्टेसची हत्या करण्यात आली आहे. या एअरहोस्टेसचा मृतदेह तिच्या फ्लॅटमध्ये आढळला आहे अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. धारदार शस्त्राने गळा चिरुन या एअरहोस्टेसची हत्या करण्यात आली. या प्रकरणाची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी या प्रकरणात सोसायटीच्या हाऊसकिपरला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. मुंबईत कुठे घडली ही घटना? मुंबईतल्या मरोळ परिसरातील एका आलिशान गृहनिर्माण संस्थेतील सदनिकेत २५ वर्षीय हवाई सुंदरीची हत्या करण्यात आल्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. मारेकऱ्याने धारदार शस्त्राने गळा चिरून तिची हत्या केली. पवई पोलिसांनी याप्रकरणी तपास सुरू केला आहे. रुपल ओग्रे या एअरहोस्टेसची हत्या मरोळ परिसरातील के. मारवाह मार्गावरील एन.जी. कॉम्प्लेक्स सोसायटीतील सी विंगमधील सदनिका क्रमांक ३०६ मध्ये रूपल ओग्रे ही तरूणी मृतावस्थेत आढळली. ती प्रशिक्षणार्थी हवाई सुंदरी होती. मुळची छत्तीसगडमधील रुपल एप्रिल २०२३ मध्ये नोकरीच्या निमित्ताने मुंबईत आली होती, असे पोलिसांनी सांगितले. रुपल या सदनिकेत तिची बहीण आणि बहिणीच्या प्रियकरासह राहात होती. परंतु, दोघेही आठ दिवसांपूर्वी रायपूर येथील त्यांच्या गावी गेले होते.रविवारी तिचे कुटुंबीय दूरध्ववनीवरून तिच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करीत होते, मात्र ती दूरध्वनी उचलत नव्हती. कुटुंबीयांनी तिच्या काही मित्रांना याबाबत माहिती दिली, ते एन.जी. कॉम्प्लेक्स सोसायटीतील



रुपलच्या घरी गेले. मात्र घराचा दरवाजा आतून बंद होता. घरातून कोणीच प्रतिसाद देत नव्हते. अखेर पोलिसांना बोलावण्यात आले, पोलिसांनी दरवाजा तोडून घरात प्रवेश केला.

त्यावेळी रुपल घरामध्ये मृतावस्थेत आढळली.

पोलिसांनी काय सांगितलं?

"तिचा गळा धारदार शस्त्राने चिरला होता. मृतदेह शवविच्छेदनासाठी घाटकोपरमधील राजावाडी रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. प्रथमदर्शनी, डॉक्टरांनी लैंगिक अत्याचाराबाबत कोणतेही पुरावे सापडलेले नाहीत. या प्रकरणाचा सर्व बाजूंनी तपास करण्यात येत आहे,

असे अधिकाऱ्याने सांगितले.

रविवारी सकाळी तिचे कुटुंबीयांशी शेवटचे बोलणे झाले होते. त्यामुळे दुपारी तिची हत्या झाली असावी, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

मारेकऱ्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तीन पथके तयार केली आहेत. रूपलच्या सदनिकेत कोण आले होते, हे जाणून घेण्यासाठी पोलीस सीसी टीव्ही कॅमेऱ्यातील चित्रणाची तपासणी करीत आहेत. स्थानिक पोलिसांबरोबरच गुन्हे शाखेचे अधिकारीही समांतर तपास करीत आहेत.

## ठाण्यात धावत्या कारनं अचानक पेट घेतला, ७ जण थोडक्यात बचावले!

रस्त्यांवर अपघाताच्या घटनांप्रमाणेच आता धावत्या गाड्यांना अचानक आग लागण्याच्या घटनाही वाढू लागल्याचं पाहायला मिळत आहे. रस्त्यावरून भरधाव वेगाने जाणाऱ्या कार अचानक पेटल्यामुळे झालेल्या दुर्घटनाही चर्चेचा विषय ठरल्या आहेत. अशीच एक घटना ठाण्याच्या मुंब्रा बायपासवर घडली असून यात सात जणांचा जीव अगदी थोडक्यात वाचला आहे. एएनआय वृत्तसंस्थेनं ठाणे महानगर पालिकेच्या हवाल्याने यासंदर्भातलं वृत्त दिलं आहे.

नेमकं काय घडलं?

मिळालेल्या माहितीनुसार रविवारी रात्री उशीरा ही कार पनवेलहून मुंब्रा बायपासमार्गे ठाण्याच्या दिशेने जात होती. मुंब्रा बायपासवर या कारने अचानक पेट घेतला. यावेळी कारमध्ये सात प्रवासी होते.

## जालना जिल्ह्यात आतापर्यं त3 हजार 181 जणांवर गुन्हे दाखल; 33 आंदोलकांना न्यायालयीन कोठडी



जालना : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जालना येथील अंतरवाली सराटी येथे आंदोलन करणाऱ्या गावकऱ्यांवर पोलिसांनी लाठीमार केल्याने याचे पडसाद राज्यभरात उमटताना पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे, जालना जिल्ह्यात आणि शहरात देखील मागील तीन दिवसांपासून ठिकठिकाणी आंदोलन करण्यात येत आहे. काही ठिकाणी हिंसाचाराच्या घटना देखील समोर आल्या आहेत. त्यामुळे पोलिसांकडून आंदोलनकर्ते यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येत आहे. तर आतापर्यंत जालना जिल्ह्यात 3 हजार 181 जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून, 33 आंदोलकांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

शुक्रवारी अंतरवाली सराटी येथे आंदोलन करणाऱ्या गावकरी आणि पोलिसांत राडा झाला. दुसऱ्या दिवशी जालना शहरातील अंबड चौफुली परिसरात जाळपोळ आणि दगडफेक झाली. दरम्यान यावेळी पोलिसांनी 12 बोअर रायफलमधून हवेत गोळीबार केला. तसेच, यावेळी जमावाला पांगवण्यासाठी लाठीचार्ज देखील करण्यात आला. दरम्यान, मागील तीन चार दिवसांत झालेल्या या सर्व घटनांनंतर पोलिसांकडून वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ज्यात, गोंदी पोलीस ठाण्यात 418, तालुका ठाण्यात 2 हजार 375 , बदनापूर 260 आणि कदीम ठाण्यात 64 असे एकूण 3 हजार 181 जणांवर आतापर्यंत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अशाप्रकारे दाखल करण्यात आले गुन्हे... जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करून मोठ-मोठाले दगड, लाकडे टाकून, वाहनांची जाळपोळ करून सार्वजनिक व खासगी मालमत्तेचे नुकसान केल्या प्रकरणी कलम 353, 332, 336, 337, 341, 435, 144, 143, 145, 146, 147, 148, 149, 109, 114 भादंविसह कलम 135 मु. पो. कायदा, सहकलम -3 व 4 सार्वजनिक मालमत्ता नुकसान कायदा, सहकलम 7 क्रिमिनल लॉ अमेन्टमेन्ट ॲक्टप्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जिल्ह्यात तणावपूर्ण शांतता... अंतरवाली सराटी येथे आंदोलन करणाऱ्या गावकरी आणि पोलिसांत झालेल्या वादानंतर याचे पडसाद राज्यभरात उमटताना पाहायला मिळत आहे. तर, जालना जिल्ह्यात देखील मागील तीन दिवसांपासून ठिकठिकाणी आंदोलन करण्यात येत आहे. काही ठिकाणी रस्ता रोको करण्यात आला, तर काही ठिकाणी टायर पेटवून आंदोलन करण्यात आले.

त्यामुळे अजूनही जिल्ह्यात तणावपूर्ण शांतता पाहायला मिळत आहे. तसेच पोलीस देखील प्रत्येक हालचालींवर लक्ष ठेवून आहेत. तसेच महत्वाच्या ठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आल्याचे पाहायला मिळत आहे. तसेच कोणेही अफवा पसरवण्याचे काम करू नयेत असे आवाहन देखील जालना पोलिसांनी केले आहेत.

## ठाणे, नवी मुंबईत नव्या पोलीस ठाण्यांच्या निर्मितीला वेग; जागेसाठी हालचाली सुरु

ठाणे : झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, त्याबरोबर वाढणारा गुन्ह्यांचा आलेख आणि वाढत्या वाहनसंख्येमुळे वाहतूक कोंडीचे केंद्र ठरत असलेल्या ठाणे आणि नवी मुंबई या लगतच्या दोन पोलीस आयुक्तालयांना आता अधिक सक्षम होण्याचे वेध लागले आहेत. लोकसंख्येच्या तुलनेत येथील पोलीस ठाण्यांची संख्या अपुरी असल्याने ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात सात, तर नवी मुंबई आयुक्तालय क्षेत्रात तीन नव्या पोलीस ठाण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करण्यात आला आहे. या दहा पोलीस ठाण्यांसाठी जागा उपलब्ध व्हावी यासाठीही वेगाने हालचाली सुरू झाल्या आहेत.

मुंबईच्या तुलनेत ठाणे, नवी मुंबईतील घरांचा पर्याय स्वस्त आहे. त्यामुळे ठाणे, दिवा, कल्याण, डोंबिवली, बदलापूर, भिवंडी, अंबरनाथ, नवी मुंबईतील वेगवेगळ्या उपनगरांमध्ये नागरीकरणाचा वेगही मोठा आहे. नवी मुंबईतील शहरांमध्ये अनेक



राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्यांची कार्यालये आहेत. त्यामुळे येथे कामानिमित्ताने येणाऱ्या नोकरदारांचे प्रमाण अधिक आहे. ठाणे जिल्ह्यातील ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी येथील शहरी भागात ठाणे शहर पोलिसांचे कार्यक्षेत्र आहे. ठाणे शहर पोलीस आयुक्तालयात एकूण ३५ पोलीस ठाणे आहेत, तर नवी मुंबई पोलीस ठाण्याची हद्द ऐरोलीजवळील दिघा ते तळोजापर्यंत आहे. नवी मुंबईत २० पोलीस ठाणे आहेत. असे असले तरी ठाणे आणि नवी मुंबई आयुक्तालय क्षेत्रातील काही पोलीस ठाण्याच्या हद्दी मोठ्या आहेत. त्यामुळे पोलिसांना तपास कामात अनेक अडथळे येतात.

काही महिन्यांपूर्वी ठाणे पोलिसांनी राज्य शासनाकडे आठ पोलीस ठाण्यांचा प्रस्ताव पाठवला होता. त्यामध्ये दिवा, कौसा, नेवाळी, कारिवली, वंजारपट्टी, दापोडे, मानससरोवर आणि काटई या पोलीस ठाण्यांचा सामावेश होता. त्यानंतर पोलिसांनी कौसा पोलीस ठाण्याची आवश्यकता नसल्याने कौसा पोलीस ठाण्याचा प्रस्ताव रद्द केला आहे. पुन्हा सात पोलीस ठाण्यांचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविल्यानंतर ठाणे पोलिसांनी जिल्हा प्रशासनाकडे जागेसंदर्भात प्रस्ताव पाठविला आहे. काही जागा पोलिसांनी सुचविल्या आहेत. नेवाळी येथील जागेसाठी सर्व्हे क्रमांक १०१, मानससरोवर पोलीस ठाण्यासाठी एका ट्रस्टच्या जागेचा काही भाग, काटई पोलीस ठाण्यासाठी औद्योगिक विकास महामंडळाचा भूखंड, दिवा पोलीस ठाण्यासाठी आगासन येथील जागेचा सामावेश आहे. तर, उर्वरित तीन पोलीस ठाण्यासाठी जागेची जिल्हा प्रशासनास चाचपणी करण्याची विनंती करण्यात आली आहे. त्यामुळे टप्प्याटप्प्याने पोलीस ठाण्यांचा जागेचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता आहे. नवी मुंबईत येथे ऐरोली, उलवे भागात नागरीकरण वाढले आहे. तसेच नवी मुंबई येथे आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम सुरू आहे. त्यामुळे येथील ऐरोली, उलवे आणि विमानतळ पोलीस ठाण्याचा प्रस्ताव नवी मुंबई पोलिसांनी राज्य शासनाकडे पाठविला आहे.

ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रातील नव्या सात पोलीस ठाण्याच्या जागेसंदर्भाचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्क:-9594418181 / 8424989898